ePaper

# महाराष्ट्रातल्या कॉंग्रेस नेत्यांवर राहुल गांधी नाराज?




॥ वर्ष - 8 । अंक -108 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## आतील पानांत


- शिरूर'ची जागा अजित पवार पक्षाकडे
- मोशी परिसराच्या विकासाला चालना म्हणून आमची साथ!
- मविआचा 90-90-90 चा नवा फॉर्म्युला!



www.mahaenews.com | शनिवार, दि. 26 ऑक्टोंबर 2024 | पुणे-पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# निवडणुकीच्या तोंडावर पुण्यात घबाड!




## तब्बल 138 कोटींचं सोनं पकडलं

### पुणे पोलिसांकडून वेगाने तपास सुरु

। पुणे। महाईन्यूज। प्रतिनिधी

**राज्यात सर्वत्र विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. निवडणुका पारदर्शक पद्धतीने पार पडाव्यात यासाठी निवडणूक आयोग दक्ष आहे. दरम्यान, पुणेपोलिसांना नाकाबंदी दरम्यान सहकार नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत १३८ कोटी रुपयांचे सोने सापडले आहे. पोलिसांनी हे सोने जप्त केले असून, यासंदर्भात निवडणूक अधिकारी आणि आयकर विभागाला कळवण्यात आले असल्याची माहिती पोलिस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी दिली.**

#### पोलीस सतर्क

1. निवडणुकीच्या धामधुमित पोलीस सतर्क
2. सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटना
3. नाकाबंदी दरम्यान टेम्पोमध्ये आढळले सोने
4. पुणेकरांसह महाराष्ट्रभर चर्चेचा विषय

शहरातील विविध विधानसभा मतदार संघातील विविध ठिकाणी २४ तास नाकाबंदी करून वाहनांची तपासणी केली जात आहे. काही दिवसांपूर्वी खेड शिवापूर टोल नाक्यावर पुणे ग्रामीण पोलिसांनी ५ कोटींची रोकड जप्त केली होती. त्यानंतर मावळात पावणे अठरा लाखांची रोकड जप्त केली होती. त्यानंतर शुक्रवारी (दि. २५) सकाळी सहकार नगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत नाकाबंदी दरम्यान एका चारचाकी छोट्या टेम्पोत पोलिसांना हे सोने आढळले.

पोलिसांनी सोन्यासह चालक आणि वाहन ताब्यात घेतले आहे. संबंधित कोट्यवधींचे सोने कुठून आले? कुणाले आहे? याबाबत याबाबतची कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. संबंधित वाहन हे ट्रान्सपोर्टचे असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

**सोने आहे कुणाचे?**

पुणे शहरात नाक बंदी केली जात आहे. यावेळी सातारा रोडवर सहकार नगर येथे पोलिसांनी एमएच ०२ ईआर ८११२ टेम्पोची तपासणी केली. त्यामध्ये 138 कोटी रुपयांचे सोने सापडले. आता हे सोने कोणाचे आहे? ते सोने कोठून आले? हे सोने कुठे जात होते? त्याचा तपास पुणे पोलीस करत आहेत. पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी सांगितले की, आम्ही संध्या कागदपत्रे तपासत आहोत. सध्या आयकर विभाग आणि निवडणूक आयोग चौकशी करत आहे. चौकशी करून पुढील कारवाई केली जाईल

**ते सोने खासगी कंपनीचे**

पोलिसांनी जप्त केलेले सोने हे खाजगी कंपनीच असल्याची माहिती मळत आहे. या सोन्याबाबत कागदपत्रे देण्यास ती कंपनी तयार आहे. हे सोने घेऊन टेम्पो मुंबईवरून पुण्यात आला होता. यावेळी निवडणुकीमुळे पुण्यात नाकाबंदी सुरु असताना त्यात सोने सापडले. आता आयकर विभाग आणि निवडणूक आयोगाला कागदपत्र कंपनीने मेले केले असल्याचे सांगण्यात येत आहे. हा टेम्पो एका खासगी लॉजिस्टिक कंपनीचा आहे.

याबाबत पुणे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास सातार रोडवर तपासणी सुरु होती. त्यावेळी टेम्पोमध्ये दागिणे असलेले पांढऱ्या पोत्यांमध्ये बॉक्स सापडले. पोलिसांनी सोने जप्त केले तसेच टेम्पो चालकाला ताब्यात घेतले.

## निवडणूक आचार संहितेची काठेकोर  अंमलबजावणी...

2024 च्या विधानसभा निवडणुकीसाठी 15 ऑक्टोबरपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्र्ग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत 15 ते 24 ऑक्टोबर 2024 पर्यंत एकूण 90 कोटी 74 लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असून त्यापैकी गेल्या 24 तासात 52 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. निवडणूक आचारसंहितेच्या काळात सजगपणे कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्यातील 19 अंमलबजावणी यंत्रणांनी एका दिवसात 52 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्याची कामगिरी बजावली आहे. विविध ठिकाणी वापरलेले पोलिस विभाग आणि इतर यंत्रणांची तपासणी नाके योग्य



# शिरूर'ची जागा अजित पवार पक्षाकडे

## पक्षाकडून माऊली कटके यांच्या नावाची घोषणा

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जिल्ह्यातील 'शिरूर' विधानसभा मतदारसंघाचा तिढा सुटला असून, महायुतीमध्ये शिरूरची जागा राष्ट्रवादी अजित पवार पक्षाला मिळाली आहे. निवडणुकीसाठी पक्षाकडून माऊली कटके यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.**




राष्ट्रवादी शरद पवार पक्ष विरोधात राष्ट्रवादी अजित पवार पक्षात होणार असल्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.जिल्ह्यातील शिरूर मतदारसंघावरून महायुतीतील भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू होती. लोकसभा निवडणुकीतही शिरूर मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी भाजपने तयारी केली होती. मात्र, ऐन वेळी हा मतदारसंघ राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला देण्यात आला आणि अजित पवार यांनी शिवसेनेचे (शिंदे) माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना पक्षात घेत त्यांना उमेदवारी दिली होती. या मतदारसंघात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाकडे तुल्यबळ उमेदवार नाही. तर, भाजपकडून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रदीप कंद निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. त्यामुळे शिरूर मतदारसंघासाठी या दोन्ही पक्षात चढाओढ सुरू झाली होती.

शिरूरची जागा मिळेल, या शक्यतेने राष्ट्रवादी अजित पवार पक्षाने शिवसेना ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष माऊली कटके यांना पक्षात घेतले होते. भाजप-राष्ट्रवादीमधील चर्चेनंतर शिरूरची जागा राष्ट्रवादी अजित पवार पक्षाला मिळाली आहे. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी कटके यांच्या नावाची घोषणा केली. शिरूरचे विद्यमान आमदार अशोक पवार यांना महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने उमेदवारी दिली आहे. अशोक पवार यांनी उमेदवारी अर्जही भरला आहे. त्यामुळे शिरूरची निवडणूक पवार विरोधात कटके म्हणजे पर्यायाने राष्ट्रवादी विरोधात राष्ट्रवादी अशीच होणार आहे. या निवडणुकीनिमित्ताने शरद पवार आणि अजित पवार या दोघांचीही प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

### पक्षाकडे तुल्यबळ उमेदवार नाही

राष्ट्रवादी शरद पवार पक्ष विरोधात राष्ट्रवादी अजित पवार पक्षात होणार असल्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.जिल्ह्यातील शिरूर मतदारसंघावरून महायुतीतील भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू होती. लोकसभा निवडणुकीतही शिरूर मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी भाजपने तयारी केली होती. मात्र, ऐन वेळी हा मतदारसंघ राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला देण्यात आला आणि अजित पवार यांनी शिवसेनेचे (शिंदे) माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना पक्षात घेत त्यांना उमेदवारी दिली होती. या मतदारसंघात राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाकडे तुल्यबळ उमेदवार नाही. तर, भाजपकडून जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रदीप कंद निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. त्यामुळे शिरूर मतदारसंघासाठी या दोन्ही पक्षात चढाओढ सुरू झाली होती.शिरूरची जागा मिळेल, या शक्यतेने राष्ट्रवादी अजित पवार पक्षाने शिवसेना ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष माऊली कटके यांना पक्षात घेतले होते. भाजप-राष्ट्रवादीमधील चर्चेनंतर शिरूरची जागा राष्ट्रवादी अजित पवार पक्षाला मिळाली आहे.शिरूरचे विद्यमान आमदार अशोक पवार यांना महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने उमेदवारी दिली आहे.

# चंद्रकांतदादांकडून कोथरुडमधील मान्यवरांच्या भेटीगाठी, अन् प्रचाराचा शुभारंभ

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी उमेदवारी जाहीर झाल्यापासून जोरदार प्रचाराला सुरुवात केली आहे. काल उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आज सकाळी पासून विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या आणि प्रथितयश व्यक्तींच्या भेटी-गाठी घेण्यास सुरुवात केली आहे. आज आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संगणक तज्ज्ञ तथा प्रसिद्ध शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांची चंद्रकांतदादा पाटील यांनी भेट घेतली. यावेळी डॉ. भटकर यांनी चंद्रकांतदादांच्या कार्याचे कौतुक केले.**




भारतीय जनता पक्षाकडून चंद्रकांतदादा पाटील यांना कोथरूड विधानसभा मतदारसंघामधून उमेदवारी जाहीर झाल्यापासून त्यांनी जोरदार प्रचाराला सुरुवात केली आहे. गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आज सकाळी कोथरूड मधील विठ्ठल मंदिरात काकड आरतीला उपस्थिती लावली. त्यानंतर आज विविध क्षेत्रातील मान्यवर आणि प्रथितयश व्यक्तींच्या भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली.

या भेटीमध्ये चंद्रकांतदादा पाटील यांना व्यापक समर्थन मिळत असून, प्रत्येक भेटीमध्ये त्यांचे आदरपूर्वक स्वागत केले जात आहे. त्यामुळे नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत प्रचारात आघाडी घेतल्याचे पाहायला मिळत आहे. आज प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ विजय भाटकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी घेतल्या. यावेळी डॉ. भटकर यांनी नामदार चंद्रकांतदादा पाटील यांच्या कार्याचे कौतुक केले.

यासोबतच चितळे बंधू मिठाईवालेचे संजय चितळे, इंद्रनील चितळे, प्रसिद्ध कथक नृत्यांगना गुरु शमा भाटे, विनीत कुबेर, रवींद्र घाटपांडे, भूपाल पटवर्धन, डॉ. दीपक शिकारपूर आदींच्या भेटीगाठी घेऊन, अनौपचारिक संवाद साधला.

# पुण्याहून हवाई प्रवास सुसाट... भोपाळपासून बँकॉकपर्यंत उड्डाण!

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

पुण्याहून देशांतर्गतसह आंतरराष्ट्रीय विमान उड्डाणांमध्ये वाढ होणार आहे. पुणे विमानतळाने हिवाळी वेळापत्रक जाहीर केले आहे. यानुसार देशांतर्गत ३५ ठिकाणांना पुण्याला हवाई मार्गाने जोडले जाणार आहे. याचबरोबर पुण्यातून तीन आंतरराष्ट्रीय उड्डाणेही होणार आहेत. हे वेळापत्रक येत्या रविवारपासून लागू होणार आहे.

पुणे विमानतळावरून आता देशांतर्गत ३५ ठिकाणांसाठी थेट विमानसेवा सुरू होईल. त्यात पुणे ते भोपाळ ही थेट विमानसेवा पहिल्यांदाच सुरू होत आहे. इंडिगो एअरलाईन्स कंपनी ही सेवा २७ ऑक्टोबरपासून सुरू करीत असून, ती दररोज असेल. याचबरोबर पुणे ते त्रिवेंद्रम ही थेट विमानसेवा इंडिगो एअरलाईन्स सुरू करीत आहे. एअर इंडिया एक्स्प्रेसकडून चेन्नई आणि कोचीसाठी थेट विमानसेवा सुरू होणार आहे. देशांतर्गत अनेक प्रमुख शहरांना पुणे हवाई मार्गाने जोडले जाणार असल्याने प्रवाशांची मोठी सोय होणार आहे, अशी माहिती पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी दिली. पुणे विमानतळावरील आंतरराष्ट्रीय उड्डाणांमध्येही वाढ होणार आहे. इंडिगो एअरलाईन्स आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या कंपन्यांकडून पुण्याहून बँकॉकसाठी थेट विमान सेवा २२ नोव्हेंबपासून सुरू होणार आहे. याचबरोबर इंडिगो एअरलाईन्सकडू पुणे ते दुबई थेट विमानसेवा सुरू होणार आहे. यामुळे आता पुण्यातून सिंगापूर, दुबई आणि बँकॉकसाठी थेट आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू होईल. सध्या सिंगापूर आणि दुबईसाठी सेवा सुरू होती. आता त्यात बँकॉकची भर पडली असून, विमानांची संख्याही वाढणार आहे, असे ढोके यांनी सांगितले.

### पूर्ण क्षमतेने वापर होणार

सध्या पुणे विमानतळावरून दैनंदिन २१८ विमानांची ये-जा होऊ शकते. मात्र, या संपूर्ण क्षमतेने त्याचा वापर होत नाही. त्यामुळे दैनंदिन सरासरी १८५ ते १९० विमानांची ये-जा होते.

## आ. महेश लांडगे यांच्या पाठीशी मोशीकर!

# मोशी परिसराच्या विकासाला चालना म्हणून आमची साथ!

## माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे यांच्यासह ग्रामस्थांची भावना

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मोशी येथील ६५० बेडचे हॉस्पिटल, न्यायालय संकुल, अभियांत्रिकी कॉलेज, आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, संविधान भवन यांसारख्या अभिनव प्रकल्पांची उभारणी भोसरी मतदारसंघात करून आमदार महेश लांडगे यांनी मोशी सारख्या समाविष्ट गावांमध्ये विकासाचा नवा अध्याय सुरू केला आहे. विशेषतः पिंपरी चिंचवडच्या तुलनेत विकासाच्या प्रवाहात मागे पडलेल्या समाविष्ट गावांना विकासाचा अर्थ सांगणाऱ्या आमदार लांडगे यांच्या पाठीशी मोशी गाव एकजुटीने उभे राहणार आहे, असा निर्धार माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे यांनी व्यक्त केला.**




भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ मोशी येथील श्री नागेश्वर महाराज मंदिरामध्ये समस्त ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये नारळ वाढवून प्रचाराचा 'श्री गणेशा' करण्यात आला.

गाव दौऱ्यामध्ये प्रचाराच्या निमित्ताने नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. फुलांची उधळण करत फटाक्याच्या आतिशबाजीत आणि रांगोळ्यांच्या पायघड्यांनी आमदार महेश लांडगे यांचे नागरिकांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले. मोशी गावठाण येथून प्रचाराला सुरुवात झाली. शिवाजीवाडी, हवालदारवस्ती, सस्ते वाडी, आल्हाटवाडी, लक्ष्मीनगर, कुदळे वस्ती, सस्ते वस्ती येथील नागरिकांचा भेटीगाठी घेण्यात आल्या. यावेळी आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून मोशी कचरा डेपो येथे वेस्ट टू एनर्जी, बायोमायनिंग, बायोगॅस निर्मिती, सीएन्डडी वेस्ट प्रकल्प कार्यान्वयीत करण्यात आला. बफर झोनची हद्दी कमी केली. त्यामुळे पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करता आल्या. यासह आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, संविधान भवन, पिंपरी-चिंचवड न्यायालय संकूल, आयआयएम कॅम्पस आणि विशेष म्हणजे जगातील सर्वांत उंच छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण' उभारण्यात येत आहे. त्यामुळे मोशी आणि परिसराचा लौकीक वाढला आहे, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत.

माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे म्हणाले की, 1997 मध्ये पिंपरी महापालिकेत मोशी आणि परिसरातील गावे समाविष्ट झाली. महापालिकेमध्ये गावे समाविष्ट होऊन देखील गावांना विकासापासून वंचित रहावे लागले. 2014 नंतर खऱ्या अर्थाने विकासाचा अर्थ या समाविष्ट गावांना समजला. हा अर्थ आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून झालेल्या विकास कामातून मिळाला. आज सर्वाधिक मोठे विकास प्रकल्प भोसरी विधानसभेत आहेत. ज्यामध्ये मोशी परिसराचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. या विकास प्रकल्पाच्या माध्यमातून मोशी तसेच आजूबाजूच्या समाविष्ट झालेल्या परिसराला महत्त्व प्राप्त झाले आहे. अनेक मोठे गृहप्रकल्प, ज्वेलर्स, ब्रँडेड कपडे व्यावसायिक मोशी परिसराला चांगला पर्याय म्हणून पहात आहेत. याचे सर्व श्रेय आमदार महेश लांडगे यांच्या दूरदृष्टीला जाते.

### आमदारांच्या विजयासाठी नागेश्वर महाराजांचा भंडारा हाती...

मोशी परिसरात आमदार महेश लांडगे यांचा प्रचाराचा प्रारंभ श्री नागेश्वर महाराज मंदिरामध्ये नारळ वाढवून करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने भंडारा उधळण्यात आला. श्री नागेश्वर महाराजांच्या साक्षीने ग्रामस्थांनी आमदार महेश लांडगे यांच्या विजयाचा भंडारा हाती घेतला आहे. तसेच, मोशीतून सर्वाधिक मतदान लांडगे यांना होईल. याद्दष्टीने आम्ही काम करीत आहोत, असा संकल्प स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

> "आमदार महेश लांडगे यांनी भोसरी विधानसभेसाठी विविध विकास प्रकल्प या भागात आणले. सामान्य जनतेच्या हिताचे निर्णय घेतले आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून राज्य सरकार अतिशय चांगले काम करत आहे. लाडकी बहीण योजना महिला भगिनींसाठी महत्त्वाची ठरत आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आपले सरकार आणण्यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या पाठीशी आम्ही सर्व एकजुटीने उभे राहणार आहोत.
>
> **– प्रा. कविता आल्हाट,**
> महिला शहराध्यक्षा, राष्ट्रवादी अजित पवार गट.

---

# किवळे गावच्या विकासासाठी आम्ही शंकरभाऊंसोबत!

## ग्रामस्थांचा एकमुखाने निर्णय; किवळे गावभेट दौऱ्यात शंकर जगताप यांनी घेतला ग्रामस्थांचा आशीर्वाद

। चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सामाजिक बांधिलकी जपत गावातील एकोपा अबाधित राखणारे गाव अशी आमच्या किवळे गावची ओळख आहे. २५ वर्षांपूर्वी आमचे गाव पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत समाविष्ट झाले. स्व. आमदार लक्ष्मण जगताप यांनी त्यांच्या कार्यकाळात आमच्या गावच्या विकासासाठी प्रामाणिकपणे काम केले. किवळेतील १८ मीटर डीपी रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांचा प्रश्न शंकरभाऊंनीही पुढाकार घेऊन मार्गी लावला. त्यामुळे गावाचा अशाच पद्धतीने यापुढेही विकास व्हावा, यासाठी आम्ही सर्व ग्रामस्थ एकजुटीने आणि एकदिलाने शंकर जगताप यांच्यासोबत राहू, असे आश्वासन किवळे ग्रामस्थांनी दिले.**



चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे भाजप - शिवसेना - राष्ट्रवादी - आरपीआय आणि मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांनी गावभेट दौऱ्यानिमित्त किवळे गावातील ग्रामस्थ आणि नागरिकांच्या गाठीभेटी घेऊन त्यांचा आशीर्वाद घेतला. यावेळी नागरिकांनी अगत्याने स्वागत करून महाविजयाचा आशीर्वाद दिला. या भेटीदरम्यान माजी नगरसेवक बाळासाहेब तरस, माजी नगरसेविका सुमन नेटके, संदीप तरस, उमेश सांडभोर, बाबासाहेब सांडभोर, सचिन सांडभोर, संदीप सांडभोर, राजेश सांडभोर, कैलास कातळे, समीर कातळे, संजय कातळे, मोरेश्वर कातळे, बाळकृष्ण कातळे, सदाशिव कातळे, तुकाराम तरस, अतिश तरस, सुधीर साळुंखे, नवनाथ तरस, भरत तरस, विश्वंभर गायकवाड, नवनाथ लोखंडे, बाळू तरस, अशोक तरस, गौतम गायकवाड, बाळासाहेब धुमाळ, किरण धुमाळ, सुरेश धुमाळ, गणेश धूमाळ, नितीन तरस, बापू तरस, दिपक तरस, निलेश तरस, गणेश जुनवणे, दिलीप दांगट, राजेंद्र तरस, शुभम दांगट, राजेश दांगट, हुमानत अण्णा बगालर, संजय चव्हाण यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला.

### गावातील असंख्य युवा कार्यकर्त्यांचा भाजप पक्षप्रवेश

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आणि भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांचे नेतृत्व आणि कार्यप्रणालीवर विश्वास व्यक्त करत किवळे परिसरातील सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब धुमाळ, सुरेश धुमाळ, प्रसाद धुमाळ, गणेश धुमाळ, किरण धुमाळ यांच्यासह असंख्य युवकांनी यावेळी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. "चिंचवड विधानसभा मतदारसंघाचा खऱ्या अर्थाने जो विकास झाला तो स्व. लक्ष्मणभाऊंच्या माध्यमातून झाला. त्यांच्या निधनानंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचे काम शंकर जगताप यांनी यशस्वीपणे केले. त्यांनी मागील दोन वर्षात भाजप पक्षवढीसाठी आणि चिंचवडच्या विकासासाठी सातत्याने नियोजनबद्ध पद्धतीने काम केले आहे. त्यांच्या याच कार्यप्रणालीने प्रभावित होऊन आम्ही हा पक्षप्रवेश करण्याचा निर्णय घेतला. आता पक्षप्रवेश करून न थांबता किवळे गावच्या विकासासाठी शंकरभाऊंनाच आमदार करणार असल्याचे", त्यांनी पक्षप्रवेशावेळी सांगितले.



## भूमिका

**राज्य अभ्यासक्रम आराखड्या'चा अंतिम मसुदा हा केंद्र (मध्यवर्ती) सरकारच्या आराखड्याप्रमाणे गोंधळलेला तर आहेच; पण 'बालभारती'ची पुस्तकं नववीपासून नकोच, अभ्यासक्रमही दिल्लीच्या पाठ्यपुस्तकांतलेच हवे, अशा शिफारशी करणारा हा आराखडा राज्याच्या शैक्षणिक प्रगतीची गळचेपी करणारा ठरेल, म्हणून तो रद्द करावा...**

# देशांतर्गत वसाहतीकरणाचा 'आराखडा'!

'मनुस्मृती'च्या अनावश्यक उल्लेखानं वादग्रस्त ठरलेल्या शालेय शिक्षणाच्या 'राज्य अभ्यासक्रम आराखड्या'चा (राअआ) अंतिम मसुदा निवडणुका जाहीर होण्याआधी घाईघाईने प्रसिद्ध झाला. अभ्यासक्रम आराखडे तयार करणे म्हणजे बोजड शब्दांतील अवजड (व बरेचदा निरर्थक) दस्तऐवज उत्पादनाचा कारखाना असल्याची भावना राज्याचं 'विद्या प्राधिकरण' (एससीईआरटी) निर्माण करतंय. शालेय शिक्षणासाठी ४१४ पृष्ठे तर बालशिक्षणासाठी तब्बल ५९९ पृष्ठे खर्ची घालणारे आराखडे, हे याचे काही नमुने. यासाठीची मूळ प्रेरणा व धाक मध्यवर्ती (केंद्र) सरकारचे आहेत हे निर्विवाद! मात्र राज्यपातळीवर शिक्षणासाठी घटनात्मकदृष्ट्या जबाबदार शिखर संस्थेकडून निर्विचार (विनाविचार) कामाचा पायंडा पडणं, संघराज्यीय लोकशाहीसाठी चिंताजनक आहे. पाच भागांमध्ये निर्मित 'राअआ'



इयत्ता तिसरी ते बारावीच्या शिक्षणासंबंधी शिफारशी करतो. मात्र हा 'अभ्यासक्रम आराखडा' आहे, की 'पाठ्यक्रम दस्तऐवज' की 'शासन परिपत्रकाचा संच', असा प्रश्न पडतो. आराखड्यांनुसार यात मार्गदर्शक तत्त्वं आणि इयत्तावार विषयरचना सुचवलीय, पाठ्यक्रम असल्यासारखी इयत्तावार क्षमताविधानं आणि अध्ययन अनुभवांची जंत्री आहे. केंद्रीकरणाचा सोस दाखवणाऱ्या परिपत्रकांप्रमाणे संबंध राज्यासाठी इयत्तावार, तासिकावार साप्ताहिक वेळापत्रकं आहेत. अशा साऱ्या गदारोळांमुळं 'अरे भाई कहना क्या चाहते हो?' ही भावना बळावत जाते. मध्यवर्ती सरकारच्या आराखड्याने प्रेरित (की भारित?) 'राअआ' म्हणजे अनेक ठिकाणी निव्वळ (सदोष) भाषांतराचा नमुना आहे. उदाहरणार्थ, डिजिटल स्रोतांची यादी देताना 'एनसीईआरटीने सर्व पाठ्यपुस्तके ऑनलाइन उपलब्ध करून दिलेली आहेत' असं म्हटलेलं आहे. (परिच्छेद ६.३.२.३, पृष्ठ १४८) मात्र ही पुस्तके स्वयम, दीक्षा, ई-पाठशाला पोर्टलवर आहेत, हे विधान (संदर्भ: एनसीएफएसई २०२३, परिच्छेद ६.३.२.३, पृष्ठ २०१) चुकीच्या पद्धतीने भाषांतरित केलंय. आराखड्यात सगळीकडं अशा गल्लतीची उदाहरणं आहेत. काही ठिकाणी तर मराठीत भाषांतर करण्याची तसदीदेखील घेतलेली नाही. इंग्रजीतला मूळ भाग कधी रोमन लिपीत (उदा. परिच्छेद ६.२.५- शिक्षक सक्षमीकरणासाठीच्या नावीन्यपूर्ण पद्धती) तर कधी इंग्रजीतला भाग नागरी लिपीत दिलाय (उदा. पृष्ठ १५८). अशा मांडणीमुळं 'राअआ' वाचणं ही अडथळ्यांची वाट ठरते, वाचताना वारंवार इंग्रजी आराखडा पाहावा लागतो. हे सारं निर्विचार व मध्यवर्ती सरकारकेंद्री व्यवहाराचं लक्षण म्हणायला हवं. तसं नसतं तर आपल्याकडं 'बालभारती'नं १९७० पासूनची पाठ्यपुस्तकं ऑनलाइन उपलब्ध करून दिली असल्याचा उल्लेख टाळला गेला नसता! 'एनसीईआरटी'च्या पाठ्यपुस्तकांना स्थान देणारा 'राअआ' आपल्या पाठ्यपुस्तकांकडं संसाधन म्हणून का पाहात नाही? महाराष्ट्रासारख्या (एकेकाळच्या!) प्रगत राज्यानं पाठ्यपुस्तकांसाठीदेखील आता दिल्लीकडं तोंड करावं का?राअआ'मध्ये या प्रश्नाचं उत्तर नि:संदिग्ध होकारार्थी आहे. नववी-दहावीच्या विषययोजनेत 'विज्ञान, गणित, इंग्रजी, हिंदी, व्यावसायिक शिक्षण अशा विषयांचे पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके एनसीईआरटीकडून जशीच्या तशी' घेण्याची घोषणा करण्यात आलीय. 'उच्च शिक्षणासाठी देश पातळीवर घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांना सुलभ जावी' म्हणून हा निर्णय घेतल्याचं सांगितलंय. एकेकाळी पथदर्शी ठरलेल्या 'बालभारती'ला आता 'एनसीईआरटी/ सीबीएसईच्या पाठ्यपुस्तकांच्या भाषांतराचं काम' उरलंय (राअआ, पृष्ठ ३३८-३९). देशात नावाजलेल्या 'बालचित्रवाणी'ला गेल्या कार्यकाळात नेस्तनाबूत करणाऱ्या विचारांचं सरकार आता 'बालभारती'च्या गळ्याला नख लावू पाहतंय.

## प्रासंगिक »

### बुणग्यांचा बाजार!

***....या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यातील अनेकांस स्वत: जिंकण्यापेक्षा समोरच्याच्या पराभवात अधिक रस आहे...***

सध्या सुरू असलेल्या विधानसभेच्या रणधुमाळीचा एक फायदा दिसतो. तो म्हणजे या राज्यातील राजकीय घाण ढवळली जाऊन पृष्ठभागावर आली. ती पाहिल्यावर महाराष्ट्रात उगवणारा प्रत्येक दिवस कालची परिस्थिती बरी होती, अशी भावना का निर्माण करतो, ते कळेल. राजकारणाने आज तळ गाठला आहे असे वाटावे तर उद्या त्यापेक्षाही खोलवर कोणी गेलेला असतो. सध्याच्या बाजारपेठीय नव्हे; तर तद्दन बाजारू संस्कृतीत राजकीय विचारधारा, तत्त्वप्रणाली इत्यादींची अपेक्षा करण्याचा मूर्खपणा कोणीही करणार नाही, हे मान्य. तरीदेखील निदान काहीएक विचार, सभ्यता, सुसंस्कृतपणा दिसावा अशी आशा बाळगण्यात काही गैर आहे, असे नाही. एकमेकांच्या नावे घेतलेल्या शपथा हवेत विरायच्या आत दुसऱ्या दारी जातो आणि नवा घरोबा करतो. याची ना लाज दररोज नवनवी शयनगृहे शोधणाऱ्यांस ना अशा प्रवासी पक्ष्यांचे स्वागत करणाऱ्यांस!

"मुलं फक्त परीक्षा देतात" पण फक्त शिकत राहण्याचं, फक्त परीक्षा देण्याचं एक वय असतं, सर्व शालेय शिक्षण आणि पुढे फारतर बारावीपर्यंत. ज्या मुलांची शालेय शिक्षणाचीही ऐपत नसते, पण शिकायची आवड असते, शिक्षणाचं महत्त्व समजलेलं असतं, ती मुलं शाळेच्या बरोबरीने काम करून शिकत राहतात .

# स्पर्धा परीक्षा देणं उत्तमच, पण किती काळ?

असं फक्त परीक्षांना बसणाऱ्या तरुणांची संख्या २५ लाखांच्या वर असेल आणि परीक्षा देण्याचं वय ३८ ते ४३ पर्यंत असेल; तर किती मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ न वापरलं जाता, फक्त परीक्षा देत राहतं? यात समाजाचं तर नुकसान होतंच, शिवाय विविध उद्योगांनाही मनुष्यबळ मिळणं थांबतं आणि 'विद्यापीठातून नुसतीच पदवी मिळते, पण या पदवीमुळे नोकरी नाही' यावर शिक्कामोर्तब होतं. विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबाचं तर अपरिमित नुकसान होतं. त्याविषयी विविध अहवालांत अभ्यासकांनी आपली निरीक्षणं मांडली आहेतच. मग ग्रामीण भागांतल्या विशिष्ट जाती-वर्गांतून आलेल्या मुला-मुलींनी अधिकारी होण्याची स्वप्नं पाहायचीच नाहीत का? तर तसं नाही. नक्कीच मोठं व्हायची स्वप्न पाहायची पण ए. पी. जे. अब्दुल कलाम सर म्हणतात तसं डोळे उघडे ठेवून. म्हणजे काय?मुलांच्या गावात सरकारी सोडल्या तर नोकऱ्या नाहीत, उद्योग नाहीत, शेती अवघड होऊन



बसलेली – हेच सगळे मुद्दे आहेत स्थलांतराचे हा आहे मुलांना आपल्या गावापासून दूर नेणारा 'पुश फॅक्टर'- जो आपल्याला आपल्या गावातून, आपल्या माणसांतून, आपल्या जमिनीतून उठून दूर जाण्यास भाग पाडतो. नोकऱ्या, उद्योग, विविध संधी, सुविधा हे असतात स्थलांतराचे 'पुल फॅक्टर्स', जे मुलांना शहरांत जाण्यास भाग पाडतात. मग आता 'डोळे उघडे ठेवून स्वप्न पाहायची' म्हणजे काय करायचं? बरं डोळे फक्त विद्यार्थ्यांनी उघडे ठेवल्याने काम भागेल? तर तसं नाही. सरकारने, उद्योगांनी आणि विद्यापीठांनीही डोळे सताड उघडे ठेवले पाहिजेत. सरकारने वेळेवर परीक्षा घेऊन, वेळेवर भरतीचे आदेश काढून; तर उद्योगांनी अविकसित भागांत उद्योगांची निदान एखादी तरी शाखा सुरू करून! – जे उद्योग अविकसित भागांत अशी शाखा सुरू करून स्थानिकांना रोजगार देतील त्यांना इन्कम टॅक्स/जीएसटी किंवा इतर टॅक्समध्ये सवलत देऊन किंवा कपात करून सरकारकडून प्रोत्साहन मिळालं पाहिजे. एनईपी २०२० मध्ये ज्याप्रमाणे म्हटले आहे त्याप्रमाणे कौशल्याधारित शिक्षण विद्यापीठांनी दिलं पाहिजे. अशा परीक्षांचे जे क्लासेस पुणे-मुंबई-दिल्लीत आहेत, त्यातले काही क्लासेस या मुलांना जवळ असतील अशा ठिकाणी सुरू केले पाहिजेत. त्यात 'आर्थिक फायदा नाही, अडचणी जास्त आहेत' असे असले तरी मोठ्या प्रमाणात तरुणाईला विस्थापित न करता, चांगले मार्गदर्शन देण्याचे काम तरी होईल. लिहिणं सोपं आहे की, 'सरकारने यांव करावं व उद्योगांनी त्यांव करावं, विद्यापीठाने असं तर क्लासेसने तसं.' पण आपल्या कुणाकडेच हे घडवून आणण्या एवढी क्षमता नाही. आपण फक्त अपेक्षा करू शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मविआचा 90-90-90 चा नवा फॉर्म्युला!

## उर्वरित 18 जागा मित्रपक्षांना- बाळासाहेब थोरात

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काँग्रेस पक्षाची आज दिल्लीत महत्वाची बैठक पार पडली. जागावाटपाच्या फॉर्म्युल्यावर या स्क्रिनिंग कमिटीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठीत महाविकास आघाडीत जागा वाटपाचा नवा फॉर्म्युला ठरवण्यात आला. नव्या फॉर्म्युल्यानुसार महाविकास आघाडीत तिन्ही पक्ष प्रत्येकी 90 जागा लढवणार आहे.**



म्हणजे काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष एकूण 270 जागा लढवणार आहेत. तर उर्वरित अठरा जागा मित्रपक्षांसाठी सोडण्यात आलेल्या आहेत. बैठक संपल्यानंतर बाळासाहेब थोरात यांनी ही माहिती दिली. तर दिल्लीतील काँग्रेस पक्षाच्या बैठकीमध्ये 55 जागांवर चर्चा झाल्याची माहिती, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. महाविकास आघाडीत एकमत झालेलं नाही अशा 5 ते 7 जागा आहेत. त्या जागांवर मैत्रीपूर्ण लढती होणार का याचा निर्णय अजून झालेला नसल्याचं त्यांनी सांगितलं. सुत्रांकडून मिळत असलेल्या माहितीनुसार जागा वाटपाच्या नव्या फॉर्म्युल्यावर तीनही घटक पक्षांचं एकमत झालं आहे. नव्या फॉर्म्युल्यानुसार आता महाविकास आघाडीतील तीन प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांच्या वाट्याला प्रत्येकी 90 जागा येणार आहेत. तर उर्वरीत 18 जागा या मित्रपक्षांसाठी सोडण्यात येणार आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार समान जागा वाटपाचं सुत्र ठरलं असून, लवकरच याबाबत घोषणा होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेस एकत्र निवडणूक लढवत असतानाची ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. याआधी गेल्या लोकसभा निवडणुकीतही तिन्ही पक्ष युतीने लढले होते. निकाल युतीच्या बाजूने लागला. अशा स्थितीत विधानसभा निवडणुकीत एमव्हीएचा आत्मविश्वास उंचावला आहे. सुरुवातीला महाविकास आघाडीमध्ये 85-85-85 फॉर्म्युला ठरवण्यात आला होता. मात्र उर्वरीत जे 28 सीटं होते, त्यावर महाविकास आघाडीमधील घटक पक्षांचं एकमत होत नव्हतं. या मतदारसंघावरून काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटामध्ये दावे-प्रतिदावे सुरू होते. यातील बहुतांश जागेवर दोन्ही पक्षांकडून दावा करण्यात आला होता. मात्र सुत्रांकडून मिळत असलेल्या माहितीनुसार यावर तोडगा काढण्यात यश आलं असून नव्या जागा वाटपाच्या फॉर्म्युल्यानुसार तीन्ही पक्षांना प्रत्येकी 90 जागा तर उर्वरीत 18 जागा या मित्र पक्षांना सोडण्यात येणार आहेत. दरम्यान जागा वाटपावर चर्चा सुरू असतानाच काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवार जाहीर करण्यास सुरुवात झाली आहे. तीनही पक्षांकडून उमेदवारांच्या पहिल्या याद्या समोर आल्या आहेत. ज्या इच्छुकांना तिकीट मिळालं नाही, त्यांची बंडखोरी रोखण्याचं मोठं आव्हान सर्वच पक्षांसमोर असणार आहे. तर उर्वरित अठरा जागा मित्रपक्षांसाठी सोडण्यात आलेल्या आहेत. बैठक संपल्यानंतर बाळासाहेब थोरात यांनी ही माहिती दिली. तर दिल्लीतील काँग्रेस पक्षाच्या बैठकीमध्ये 55 जागांवर चर्चा झाल्याची माहिती, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. महाविकास आघाडीत एकमत झालेलं नाही अशा 5 ते 7 जागा आहेत. त्या जागांवर मैत्रीपूर्ण लढती होणार का याचा निर्णय अजून झालेला नसल्याचं त्यांनी सांगितलं. सुत्रांकडून मिळत असलेल्या माहितीनुसार जागा वाटपाच्या नव्या फॉर्म्युल्यावर तीनही घटक पक्षांचं एकमत झालं आहे. नव्या फॉर्म्युल्यानुसार आता महाविकास आघाडीतील तीन प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांच्या वाट्याला प्रत्येकी 90 जागा येणार आहेत. तर उर्वरीत 18 जागा या मित्रपक्षांसाठी सोडण्यात येणार आहेत.

### बंडखोरी रोखण्याचं मोठं आव्हान

समोर आलेल्या माहितीनुसार समान जागा वाटपाचं सुत्र ठरलं असून, लवकरच याबाबत घोषणा होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे, शरद पवार आणि काँग्रेस एकत्र निवडणूक लढवत असतानाची ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. याआधी गेल्या लोकसभा निवडणुकीतही तिन्ही पक्ष युतीने लढले होते. निकाल युतीच्या बाजूने लागला. अशा स्थितीत विधानसभा निवडणुकीत एमव्हीएचा आत्मविश्वास उंचावला आहे. सुरुवातीला महाविकास आघाडीमध्ये 85-85-85 फॉर्म्युला ठरवण्यात आला होता. मात्र उर्वरीत जे 28 सीटं होते, त्यावर महाविकास आघाडीमधील घटक पक्षांचं एकमत होत नव्हतं.


# आदित्य ठाकरेंची सभा ठरली उत्स्फूर्त

## महाविकासच्या उमेदवार म्हणून वैशालीताईंची उमेदवारी दाखल

। जळगाव ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राज्यात लोकशाहीची हत्या होतांना कोर्टकचेऱ्या, निवडणूक आयोग आणि प्रशासन अशा यंत्रणा हाताशी धरून गद्दारांनी मनमानी केली,याची चीड साऱ्यांच्या मनात असल्याने प्रत्येक सर्वसामान्य माणूस पेटून उठला आहे.**



गाव-खेड्यापासून ते थेट उद्धव साहेबांपर्यंत अशा सर्व निष्ठावंतांवर झालेला अन्याय,अत्याचाराचा अतिरेक आता संपणार असून टक्केवारी,गुंडगिरी व दहशतीचे राजकारण करणाऱ्या गद्दारांना आता घरी बसवून पाचोऱ्यात महाविकास आघाडीचा झेंडा नक्की फडकेल,असा विश्वास आपल्या अत्यंत आत्मविश्वासपूर्ण मनोगतातून येथील महाविकास आघाडीच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या उमेदवार सौ.वैशालीताई सूर्यवंशी यांनी व्यक्त केला.काल शुक्रवार,25 ऑक्टोबर रोजी दुपारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी जामनेर रस्त्यावरील गुरुकुल इंग्लिश स्कूल जवळच्या भव्य मैदानावर आयोजित जाहीर सभेत त्या बोलत होत्या. सभेला शिवसेनेचे युवा नेते माजी मंत्री आदित्य ठाकरे यांची विशेष उपस्थिती होती. कशावरून, आदित्य ठाकरेंचा सवालमाजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी आ. किशोर पाटील यांचे नाव न घेता समाचार घेतला.पाठीत खंजीर खुपसून आमदार सुरतला पळाले. हे गद्दार स्वतःला विकू शकतात ते मतदारांनाही विकतील.

### अलोट गर्दीच्या साक्षीने उमेदवारी

सभेनंतर ढोल- ताशांच्या गजरात सभास्थळापासून ते छ.शिवाजी महाराजांच्या चौकापर्यंत बैलगाडीवर येत छत्रपती शिवराय,डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळे,महात्मा फुले यांच्या स्मारकाला माल्यार्पण करून वैशालीताई सूर्यवंशी यांनी अलोट जनसमुदायाच्या साक्षीने शक्ति प्रदर्शन करत अर्ज दाखल केला.यावेळी जळगाव जिल्हा संपर्क प्रमुख संजय सावंत,माजी खासदार उन्मेष पाटील,माजी महापौर विष्णू भंगाळे,काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा प्रतिभाताई शिंदे या मान्यवरांसह जिल्ह्यातील व मतदार संघांतील शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# महाविकास आघाडीत बिघाडी?

## समाजवादी पक्ष बंड पुकारण्याच्या तयारीत, स्वबळावर निवडणूक

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांनी महाविकास आघाडीच्या जागावाटपात होत असलेल्या विलंबावरून नाराजी व्यक्त केली आहे. उद्यापर्यंत जागावाटप जाहीर न झाल्यास समाजवादी पक्ष स्वबळावर निवडणूक लढवेल, असा इशारा त्यांनी दिला. त्यांनी शरद पवार यांची भेट घेत पाच जागांची मागणी केली. पाच जागा न मिळाल्यास आपण २५ जागांवर स्वतंत्र उमेदवार उभे करु, असा इशारा त्यांनी दिला आहे.**




समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची भेट घेतली आहे. "महाविकास आघाडीच्या जागावाटपात होत असणारा उशिर हा चुकीचा आहे. महाविकास आघाडीचं जागावाटप उद्यापर्यंत जाहीर झालं नाही तर समाजवादी पक्ष स्वबळावर निवडणूक लढवणार. समाजवादी पक्षाचे 5 जागांवर उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. आम्हाला 5 जागा मिळाव्यात ही विनंती मी शरद पवारांकडे केली. आम्हाला तितक्या जागा न मिळाल्याल आम्ही 25 जागांवर स्वातंत्र्य लढणार", अशी घोषणा अबू आझमी यांनी केली. "मी पाच उमेदवार दिले आहेत. मी वाट बघू शकत नाही. सरकार बनवायचं आहे. मात्र फार वेळ जात आहे. ही खूप मोठी चूक आहे. लोक या ठिकाणी अजून उभे आहेत. माझे 25 उमेदवार आहेत. मला यांनी सांगावे. नाहीतर मी लढतो. मविआच्या नेत्यांनी उत्तर द्यावे. कारण शेवटी हे लोक धोका देतात", अशी भूमिका अबू आझमी यांनी मांडली. "दिल्ली येणे-जाणे सुरु आहे. दिल्लीवाले काय करतील? मी अध्यक्ष आहे. माझ्याकडे एबी फॉर्म आहे. मी हवा त्याला वाटून देणार. अनुशक्ती नगर, भायखळा, वर्सोवा या ठिकाणी उमेदवार आहेत. माझे उमेदवार शरद पवारांनी मागितले तर जातील", असं अबू आझमी म्हणाले."नवाब मलिक येऊ द्या समोर, लढू द्या, काय होतं ते बघू. मायनरीटीवाले लोक, आंबेडकरवादी, आदिवासी विचारांचे लोक भाजपला मतदान करत नाहीत. मी स्वतंत्र झालो तर मी 25 उमेदवार देणार. सन्मानाने बोलू आणि विषय संपू, असं शरद पवार म्हणाले", अशी माहिती अबू आझमी यांनी दिली.यावेळी अबू आझमी यांवी झिशान सिद्दीकी यांच्या प्रश्नावरही प्रतिक्रिया दिली. झिशान सिद्दीकी यांनी महायुतीत प्रवेश केला आहे. त्यांचा अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश झाला आहे. याबाबत अबू आझमी यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी "निवडून आले आणि वफ्फ बोर्ड बिल आल्यावर काय म्हणणार? आपल्या लोकांच्या विरोधात उभे राहणार का?", असा सवाल आझमी यांनी केला. महाविकास आघाडीच्या तीन राजकीय पक्षांची बैठक शरद पवार यांच्यासमोर झाली. ८५-८५-८५ या जागांवर मिळून एकूण २७० जागांवर एकमत झालं आहे. उर्वरित १८ जागांवर शेकाप, कम्युनिस्ट, समाजवादी पक्षांसोबत चर्चा सुरु आहेत. लवकरच या जागांवर आमच्यामध्ये स्पष्टता येईल. महाविकास आघाडी ( MVA NEWS ) म्हणून ही निवडणूक लढत आहोत. महाराष्ट्रात मविआचं ( MVA NEWS ) सरकार येईल, असं नाना पटोले म्हणाले. शरद पवार यांच्यासह झालेल्या बैठकीनंतर मविआच्या सर्व पक्षाच्या नेत्यांनी पत्रकार परिषद घेत जागावाटपासंदर्भातील घोषणा केली आहे. मविआ १८ जागा कुणाला देणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. अशातच अबू आझमी यांनी त्यांना २५ जागा मिळाल्या नाहीत तर वेगळं लढण्याचा निर्णय घेऊ असा इशारा दिला आहे.

### अबू आझमी नेमकं काय म्हणाले?

"मी शरद पवारांशी चर्चा केली. शरद पवारच योग्य नेते आहेत. कारण इतर दोन पक्षात दुसरं कुणीही त्यांच्या इतकं मोठं नाही. मी पाच उमेदवार जाहीर केले आहेत. जर मला २५ जागा मिळाल्या तर ठीक कारण मला याआधी काँग्रेसने मला दोनवेळा दगा दिला आहे. एक दोन दिवस राहिले की दगा दिला जातो. मला एक दिवसाची वेळ दिली आहे. २६ तारखेला दुपारपर्यंत माझ्या पाच उमेदवारांची यादी आणि आणखी एक दोन जागा दिल्या तर ठीक अन्यथा मी २५ ते ३० उमेदवार जाहीर करेन आणि त्यांना स्वतंत्रपणे लढवेन. दिल्लीतले काँग्रेसचे नेते काय करत आहेत? इथले नेते दिल्लीत कशाला जातात? इथल्या नेत्यांना अधिकार द्यायचे नसतील तर त्या काँग्रेसच्या नेत्यांना अध्यक्ष कशाला केलं आहे? मी सपाचा महाराष्ट्रातला अध्यक्ष आहे. माझ्याकडे एबी फॉर्म आहेत. मी ज्याला हवे त्याला ते देऊ शकतो. काँग्रेसला निर्णय घेता येत नाहीत म्हणूनच त्यांचा पराभव होतो" असा टोलाही अबू आझमी यांनी लगावला आहे.

---

# भडकले कांदे, महायुतीचे वांदे; नाशकात ठिणगी

## शिंदेंचा आमदार भुजबळांना नडणार, 2 जागांवर लढणार

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभा निवडणुकीत नाशिकच्या जागेवरुन महायुतीमध्ये कित्येक दिवस चर्चेचं गुऱ्हाळ सुरु होतं. राष्ट्रवादीचे मंत्री छगन भुजबळ नाशिकची जागा लढण्यास उत्सुक होते. पण विद्यमान खासदार शिंदेसेनेचा असल्यानं त्यांनी अखेरपर्यंत नाशिकवरील दावा सोडला नाही. त्यामुळे अखेर नाशिकची जागा शिंदेसेनेलाच सुटली. पण प्रचाराला कमी वेळ मिळाल्यानं शिंदेसेनेचे उमेदवार हेमंत गोडसे यांचा पराभव झाला.**

आता विधानसभेत महायुतीत पुन्हा एकदा शिंदेसेना विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस असा वाद नाशिकमध्ये सुरु झाला आहे.**नाशिकच्या नांदगाव मतदारसंघाचे सेना आमदार सुहास कांदे यांना पक्षानं विधानसभेसाठी पुन्हा उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांचे पुतणे समीर भुजबळ यांना नांदगावातून निवडणूक लढायची होती. पण इथला आमदार सेनेचा असल्यानं महायुतीत ही जागा सेनेकडे गेली. त्यामुळे समीर भुजबळ यांनी बंडखोरी केली. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई अध्यक्ष पदाचा राजीनामा देत आमदार सुहास कांदे यांच्याविरोधात शड्डू ठोकला आहे. समीर भुजबळ नांदगावमधून २८ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.नाशिकच्या नांदगाव मतदारसंघाचे सेना आमदार सुहास कांदे यांना पक्षानं विधानसभेसाठी पुन्हा उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांचे पुतणे**



**समीर भुजबळ यांना नांदगावातून निवडणूक लढायची होती. पण इथला आमदार सेनेचा असल्यानं महायुतीत ही जागा सेनेकडे गेली. त्यामुळे समीर भुजबळ यांनी बंडखोरी केली. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या मुंबई अध्यक्ष पदाचा राजीनामा देत आमदार सुहास कांदे यांच्याविरोधात शड्डू ठोकला आहे. समीर भुजबळ नांदगावमधून २८ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. भुजबळ थेट नांदगावातून येऊन कांदेंना आव्हान देणार असल्यानं मग कांदे समर्थकही इरेला पेटले आहेत. त्यांनी थेट येवल्यातून कांदे यांचा उमेदवार अर्ज दाखल केला आहे. कांदे समर्थकांनी येवल्यात अपक्ष अर्ज भरला आहे. त्यामुळे कांदे यंदा दोन मतदारसंघांमधून लढणार आहेत. येवल्यात ते थेट मंत्री छगन भुजबळ यांना आव्हान देतील.**

### भुजबळ विरुद्ध कांदे जुनाच वाद

भुजबळ विरुद्ध कांदे वाद नाशिककरांसाठी नवा नाही. भुजबळ यांचे पुत्र २००९ आणि २०१४ मध्ये नांदगाव विधानसभा मतदारसंघातून निवडून आले. दोन्हीवेळा त्यांनी सेनेच्या उमेदवाराचा पराभव केला. २०१४ मध्ये पंकज भुजबळांनी सुहास कांदे यांना मात दिली होती. कांदे १८ हजार ४३६ मतांनी पराभूत झाले होते. पण २०१९ मध्ये कांदे यांनी भुजबळांना १४ हजार मतांनी पराजय करत विधानसभा गाठली. तर छगन भुजबळ येवल्यातून २००४ पासून सलग चारवेळा निवडून आले आहेत.

# किरणने सांगितला लग्नानंतर झालेल्या ट्रोलिंगचा अनुभव

अभिनेता आमिर खानने किरण रावशी दुसरं लग्न केलं होतं. आमिर व रीना दत्ता यांचा घटस्फोट झाल्यावर त्याने किरणशी लग्न केलं होतं. किरण चश्मा लावते, त्यामुळे आमिरशी लग्न केल्यावर खूप ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता, असा किरण रावने खुलासा केला आहे. लोक तिच्या लूकची खिल्ली उडवायचे, असं ती म्हणाली. किरण व आमिर तीन वर्षांपूर्वी विभक्त झाले आहेत. पण ते त्यांच्या मुलाचा एकत्र सांभाळ करतात. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत किरणने महिला दिग्दर्शकांना त्यांचे चित्रपट प्रदर्शित करताना येणाऱ्या आव्हानांबद्दल विधान केलं. इंडस्ट्रीमध्ये पुरुषांच्या तुलनेत महिलांना मिळणाऱ्या सन्मानाबद्दल ती बोलली. याचबरोबर तिने आमिर खानशी लग्न केल्यावर झालेल्या टीकेबाबतही सांगितलं.किरणने आमिरशी लग्न केल्यानंतर तिला ट्रोल करण्यात आलं होतं. 'कोणत्या चश्मिष महिलेशी आमिर खानने लग्न केलंय?', असं लोक म्हणायचे. लोकांचं विविध प्रकारचं बोलणं ऐकूनही आपण नेहमीच आपल्या स्वातंत्र्याला महत्त्व दिलं आणि आपलं काम सुरू ठेवलं, असं ती सांगते. तसेच आता मी अशा टप्प्यावर





पोहोचली आहे जिथे इतरांच्या मतांना मी महत्त्व देत नाही, असंही तिने नमूद केलं.किरणच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास नुकताच तिचा 'लापता लेडीज' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेला हा चित्रपट हिट झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला खूप चांगला प्रतिसाद मिळाला. लोक तिच्या लूकची खिल्ली उडवायचे, असं ती म्हणाली. किरण व आमिर तीन वर्षांपूर्वी विभक्त झाले आहेत. पण ते त्यांच्या मुलाचा एकत्र सांभाळ करतात. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत किरणने महिला दिग्दर्शकांना त्यांचे चित्रपट प्रदर्शित करताना येणाऱ्या आव्हानांबद्दल विधान केलं. इंडस्ट्रीमध्ये पुरुषांच्या तुलनेत महिलांना मिळणाऱ्या सन्मानाबद्दल ती बोलली. याचबरोबर तिने आमिर खानशी लग्न केल्यावर झालेल्या टीकेबाबतही सांगितलं.किरणने आमिरशी लग्न केल्यानंतर तिला ट्रोल करण्यात आलं होतं. 'कोणत्या चश्मिष महिलेशी आमिर खानने लग्न केलंय?',

## प्रियांकाने साजरी केली धुळवड

होळीचा सण आला आणि काल धुळवड मोठ्या प्रमाणात साजरी झाली. मनोरंजनसृष्टीतील अनेक कलाकारांनी मोठ्या उत्साहात रंगपंचमी साजरी केली.
बॉलीवूडमधील अनेक कलाकारांचे रंगपंचमी साजरी करतानाचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले.
बॉलीवूडचं लोकप्रिय कपल प्रियांका आणि निकनेसुद्धा काल होळीचा आनंद लुटला.
चोप्रा कुटुंबाने भव्य होळीची पार्टी आयोजित केली होती. प्रियांका आणि निक जोनासची लाडकी लेक मालतीची भारतातली ही पहिलीच धुळवड होती.
होळीतील प्रियांका, निक आणि मालतीचे फोटो सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहेत. यातल्या एका फोटोमध्ये प्रियांका तिचा मित्रपरिवार आणि कुटुंबाबरोबर दिसतेय. यात मालतीने सफेद रंगाचा ड्रेस आणि टोपी घातली आहे.

## दियाचा प्रोजेक्ट काय ?

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री दिया मिर्झाचा नवा प्रोजेक्ट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या प्रोजेक्टमध्ये काही मराठी कलाकारांची वर्णी लागली आहे. या मराठी कलाकारांनी सोशल मीडियावर पोस्ट करून दियाच्या नव्या प्रोजेक्टची माहिती दिली आहे. दिया मिर्झाची 'पन्हं' या नावाची नवीन शॉर्ट फिल्म भेटीस येत आहे. या शॉर्ट फिल्मची दिया ही निर्माती असून यामध्ये बरेच मराठी कलाकार झळकणार आहे. यात 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप पाहायला मिळणार आहे. यासंदर्भात त्याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली. "हृदयाच्या कोपऱ्यातला अत्यंत लाडका प्रोजेक्ट..'पन्हं'", असं कॅप्शन लिहीत त्याने काही फोटो शेअर केले आहेत.याशिवाय पृथ्वीकसह अभिनेत्री सायली संजीव देखील दियाच्या आगामी प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे. तिने देखील इन्स्टाग्राम स्टोरीवर या प्रोजेक्टसंबंधित पोस्ट शेअर केली आहे. "या प्रोजेक्टचा एक भाग होण्याचा मला खूप आनंद आहे," असं लिहून तिने एक फोटो शेअर केला आहे.पृथ्वीक प्रताप व सायली संजीवबरोबर अभिनेता सुहास शिरसाट देखील 'पन्हं' या शॉर्ट फिल्ममध्ये झळकणार आहे. यासंदर्भात सुहासने इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे. "एका दमदार टीमबरोबर नवीन काम", असं लिहितं अभिनेत्याने क्लॅपचा फोटो शेअर केला आहे.दरम्यान, दिया मिर्झाची ही शॉर्ट फिल्म काय आहे?



## लाथ मारल्यामुळे वरुण भडकला

आयपीएलच्या हंगामाला नुकतीच सुरुवात झाली असून, रविवारी मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्सचा सामना पार पडला. सामन्यादरम्यान अचानक एक श्वान मैदानात घुसल्याने सगळ्यांची तारांबळ उडाली. पोलीस आणि इतर लोक त्या धावत्या श्वानाला पकडण्यासाठी पाय मधे टाकून त्याला अडविण्याचा प्रयत्न करत होते. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या प्रकारामुळे बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी संताप व्यक्त केला आहे. मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या जेव्हा गोलंदाजीसाठी सज्ज झाला तेव्हा श्वान मैदानात घुसला. त्यामुळे सामना थोडा वेळ थांबविण्यात आला. हार्दिक पांड्याने कुत्र्याला आपल्याकडे बोलावले असता, स्टेडियममधील ग्राउंड स्टाफने पाठलाग करून, कुत्र्याला मैदानातून हाकलून दिले.'स्ट्रीट डॉग्स ऑफ बॉम्बे'च्या अधिकृत इन्स्टाग्राम पेजवर हा व्हिडीओ शेअर करण्यात आला होता. श्वानाला अथकपणे लाथ मारल्यामुळे आणि त्याचा पाठलाग केल्याबद्दल त्यांनी ग्राउंड स्टाफला फटकारले. हा व्हिडीओ आपल्या स्टोरीवर शेअर करीत, वरुण धवनने आपला संताप व्यक्त केला.
"श्वान काही फुटबॉल नाही. श्वान कोणाला नुकसान पोहोचवत नाही किंवा तो चावतही नाही आहे. बेपर्वाईनं वागण्यापेक्षा याबाबत एक चांगला मार्ग योजणं आवश्यक आहे," अशा शब्दांत वरुणने श्वानाबरोबर गैरवर्तन करणाऱ्यांना फटकारले.सामन्यादरम्यानचा श्वानाचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. श्रद्धा कपूरचा भाऊ सिद्धांत कपूरनेसुद्धा कमेंट करीत आपला राग व्यक्त केला आहे. "हा व्हिडीओ म्हणजे आजच्या काळातील मानवतेच्या स्थितीचं हे वर्णन आहे. हे खूप लज्जास्पद आहे."आयपीएलच्या हंगामाला नुकतीच सुरुवात झाली असून, रविवारी मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्सचा सामना पार पडला.

## मी शाहरुख खानसमोर तासभर रडले होते

प्रसिद्ध कोरिओग्राफर व दिग्दर्शक फराह खान आणि शाहरुख खान खूप जवळचे मित्र आहेत. एका मुलाखतीत, फराहला ४० व्या वर्षी आयव्हीएफद्वारे गर्भधारणा झाली, होती. ती तीन बाळांना जन्म देणार आहे, ही आनंदाची बातमी कुटुंबाबाहेरच्या कुणाला दिली असेल तर तो शाहरुख पहिला होता, असा खुलासा फराहने केला आहे. 'ओम शांती ओम'चे शूटिंग करत असताना फराह गरोदर होती, त्यावेळी शाहरुख सेटवर खूप काळजी घ्यायचा, असं फराहने सांगितलं.नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटी यूट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत फराहने सांगितलं की ती शूट्या आधी आणि नंतर आयव्हीएफ उपचारांसाठी जायची. ते क्लिनिक सेटपासून एक तासाच्या अंतरावर होते. सुरुवातीला उपचारात खूप अडचणी येत होत्या, तेव्हा सेटवर परत येताना रडायचे, असं फराह म्हणाली."पहिल्या पाच-सहा महिन्यांत खूप त्रास झाला. मला खूपदा डॉक्टरांनी भूल दिली होती. एकदा डॉक्टरकडे गेल्यावर मला खात्री होती की मी गरोदर आहे, पण मला दवाखान्यातच मासिक पाळी आली. त्यानंतर बऱ्याचदा मी दवाखान्यातून शूटिंगला परत येईपर्यंत रडत असे. एके दिवशी मध्यरात्री मला डॉक्टरांचा फोन आला आणि सांगितलं की मी गरोदर नाही. आम्ही एक कॉमिक सीन शूट करत होतो. शाहरुखला कळालं की मला काहीतरी झालंय, कारण मी रडण्याच्या तयारीत होते. मग त्याने सर्वांना ब्रेक दिला आणि मला त्याच्या व्हॅनमध्ये नेलं, असं फराह म्हणाली.
मी म्हणाले, 'मला तुला काहीतरी सांगायचं आहे'. त्याने माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाला, 'तू गरोदर आहेस का?' आम्हाला दर्द-ए-डिस्को गाण्याचं शूटिंग संपवायचं होतं आणि प्रत्येक वेळी तो शर्ट काढायचा तेव्हा मी त्याचं शर्ट वर फेकून देत असे.



# एकतर्फी पराभव किंवा मोठा विजय!

## पुण्यातील खेळपट्टीचा रेकॉर्ड इंडियाला धडकी भरवणारा

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना पुण्यातील एमसीए स्टेडियमवर खेळवला जात आहे. तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना गमावल्यानंतर टीम इंडिया १-० ने पिछाडीवर आहे. दुसरीकडे, पुणे कसोटीतही टीम इंडियाची स्थिती बिकट झाली आहे. दुसऱ्या कसोटीत टीम इंडियाला पराभवाचा फटका बसण्याची मोठी शक्यता आहे.**



पुणे कसोटीच्या पहिल्या दिवशी टीम इंडियाने न्यूझीलंडला २५९ धावांवर ऑलआउट केले होते. तर भारतीय संघ पहिल्या डावात १५९ धावा करत सर्वबाद झाला. तर दुसऱ्या डावात फलंदाजी करताना न्यूझीलंडने दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ५ विकेट्स गमावत ३०१ धावांची आघाडी मिळवली आहे. अशारितीने टीम इंडियाची अवस्था न्यूझीलंडपेक्षा वाईट असल्याचे दिसून आले. आता टीम इंडियाचा ७ वर्ष जुना विक्रम अधिक ताण वाढवणारा आहे. त्यामुळे टीम इंडियावर पराभवाचा धोका निर्माण झाला आहे.न्यूझीलंड संघाकडे ३०० अधिक धावांची आघाडी आहे तर त्यांच्याकडे अजून ५ विकेट्सही शिल्लक आहेत. त्यामुळे संघ किती धावांची आघाडी मिळवणार, हेही पाहण्यासारखं आहे. या मैदानावर यापूर्वी दोन कसोटी सामने खेळवले गेले होते, या दोन्ही सामन्यांचा रेकॉर्ड पाहता टीम इंडियाचं टेन्शन वाढलं आहे. पुण्याच्या मैदानावर भारताचा सामना २०१७ मध्ये दक्षिण आफ्रिका संघाविरूद्ध झाला होता. या सामन्यात भारताची कामगिरी फारच खराब होती. भारतीय संघ पहिल्या डावात १०६ धावांवर सर्वबाद झाला तर दुसऱ्या डावात १०७ धावांवर सर्वबाद झाला होता. त्यामुळे ऑस्ट्रेलिया संघाने तब्बल ३३३ धावांनी भारतावर मोठा विजय मिळवला होता.२०१७ मध्ये पुण्यातील याच मैदानावर झालेल्या भारत आणि ऑस्ट्रेलिया सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर प्रथम फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियन संघ २६० धावांवर ऑलआऊट झाला. यानंतर टीम इंडिया या मॅचच्या पहिल्या इनिंगमध्ये अवघ्या १०५ धावांवर ऑल आऊट झाली. विशेष म्हणजे या सामन्याच्या पहिल्या डावातही विराट कोहली शून्यावर बाद झाला होता. त्यावेळी कोहली टीम इंडियाचा कर्णधार होता. यानंतर भारताचा दुसरा सामना २०१९ मध्ये दक्षिण आफ्रिका संघाविरूद्ध झाला होता. या सामन्यात भारताने मोठा विजय मिळवला होता. या सामन्यात विराट कोहलीच्या २५४ धावांच्या जोरावर टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेवर एक डाव आणि १३७ धावांनी मोठ्या विजयाची नोंद केली होती. त्यामुळे हे दोन्ही सामने पाहता पुण्याच्या या मैदानावर एकतर संघ मोठा ऐतिहासिक विजय मिळवू शकतो किंवा संघाला एकतर्फी पराभवाला सामोरे जावे लागले होते. त्यामुळे हा रेकॉर्ड पाहता भारतावर पराभवाचा धोका आहे. अशारितीने टीम इंडियाची अवस्था न्यूझीलंडपेक्षा वाईट असल्याचे दिसून आले.

### टीम इंडिया 1-0 ने पिछाडीवर

यानंतर भारताचा दुसरा सामना २०१९ मध्ये दक्षिण आफ्रिका संघाविरूद्ध झाला होता. या सामन्यात भारताने मोठा विजय मिळवला होता. या सामन्यात विराट कोहलीच्या २५४ धावांच्या जोरावर टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेवर एक डाव आणि १३७ धावांनी मोठ्या विजयाची नोंद केली होती. त्यामुळे हे दोन्ही सामने भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना पुण्यातील एमसीए स्टेडियमवर खेळवला जात आहे. तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना गमावल्यानंतर टीम इंडिया १-० ने पिछाडीवर आहे.

आता टीम इंडियाचा ७ वर्ष जुना विक्रम अधिक ताण वाढवणारा आहे. त्यामुळे टीम इंडियावर पराभवाचा धोका निर्माण झाला आहे.न्यूझीलंड संघाकडे ३०० अधिक धावांची आघाडी आहे तर त्यांच्याकडे अजून ५ विकेट्सही शिल्लक आहेत. त्यामुळे संघ किती धावांची आघाडी मिळवणार, हेही पाहण्यासारखं आहे. या मैदानावर यापूर्वी दोन कसोटी सामने खेळवले गेले होते, या दोन्ही सामन्यांचा रेकॉर्ड पाहता टीम इंडियाचं टेन्शन वाढलं आहे. पुण्याच्या मैदानावर भारताचा सामना २०१७ मध्ये दक्षिण आफ्रिका संघाविरूद्ध झाला होता. या सामन्यात भारताची कामगिरी फारच खराब होती. भारतीय संघ पहिल्या डावात १०६ धावांवर सर्वबाद झाला तर दुसऱ्या डावात १०७ धावांवर सर्वबाद झाला होता. त्यामुळे ऑस्ट्रेलिया संघाने तब्बल ३३३ धावांनी भारतावर मोठा विजय मिळवला होता.२०१७ मध्ये पुण्यातील याच मैदानावर झालेल्या भारत आणि ऑस्ट्रेलिया सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.करताना ऑस्ट्रेलियन संघ २६० धावांवर ऑलआऊट झाला. यानंतर टीम इंडिया या मॅचच्या पहिल्या इनिंगमध्ये अवघ्या १०५ धावांवर ऑल आऊट झाली. विशेष म्हणजे या सामन्याच्या पहिल्या डावातही विराट कोहली शून्यावर बाद झाला होता. त्यावेळी कोहली टीम इंडियाचा कर्णधार होता.

# घरच्यांनी का ठेवलं 'वॉशिंग्टन' हे नाव?

## वॉशिंग्टन सुंदरच्या नावामागची काय आहे नेमकी कहाणी?

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वॉशिंग्टन सुंदरने पुणे कसोटीत आपल्या फिरकीच्या जोरावर किवी संघाला चांगलाच धक्का दिला. पुण्यात सुरू असलेल्या भारत-न्यूझीलंडविरूद्ध दुसऱ्या कसोटीपूर्वी बीसीसीआयने संघात मोठ बदल करत वॉशिंग्टन सुंदरला सामील केले. वॉशिंग्टनला २०२१ नंतर कसोटी सामन्यात खेळण्याची संधी मिळाली.**




सुंदरने या संधीचं सोनं करत पहिल्या डावात ७ विकेट्स घेत जबरदस्त कामगिरी केली. यानंतर वॉशिंग्टनने दुसऱ्या डावातही ४ विकेट्स घेत आपल्या भेदक गोलंदाजीचा प्रत्यय दिला आहे. वॉशिंग्टन सुंदर हा मूळचा तमिळनाडूचा आहे. पण मग त्याचं नाव वॉशिंग्टन असं का आहे, त्याच्या नावामागची नेमकी कहाणी काय आहे, हे जाणून घेऊया. त्याचं नावं वॉशिग्टन का ठेवण्यात आले याबद्दलचा किस्सा त्याच्या वडिलांनीच काही वर्षांपूर्वी 'द हिंदू' या वृत्तपत्राला दिलेल्या एका विशेष मुलाखतीमध्ये सांगितला होता.भारतीय असूनही इंग्रजी व्यक्तीप्रमाणे मुलाला दिलेल्या नावाबद्दल सुंदर म्हणाले की, मी हिंदू असून, आमचे कुटुंब अगदी साधे आहे. ट्रिप्लिकेनमध्ये (आत्ताचे थिरुवल्लीकेनी) आमच्या घरापासून दोन गल्ल्या सोडून सैन्यातून निवृत्त झालेले पी. डी. वॉशिंग्टन नावाचे एक गृहस्थ राहत होते. ते क्रिकेटचे मोठे चाहते होते. आम्ही क्रिकेट खेळायला जायचो तेव्हा ते मरिना मैदानावर आमचा खेळ पाहण्यासाठी यायचे. ते स्वत: एक उत्तम क्रिकेटपटू होते. आमच्या घरची परिस्थिती बेताचीच होती. म्हणून माझ्या खेळाच्या प्रेमात पडलेल्या या गृहस्थांनी मला शाळेचा गणवेश घेऊन दिला.

### माझ्या शाळेची फी भरली

माझ्या शाळेची फी भरली तसेच पुस्तके दिल्याच्या आठवणी सुंदर यांनी या मुलाखतीमध्ये सांगितल्या. केवळ आर्थिक मदत नाही तर वॉशिंग्टन हे मला सायकलीवरुन मैदानावर घेऊन जायचे. सुंदर यांनी रणजी संघात स्थान मिळवल्यानंतर वॉशिंग्टन खूप खूश झाले होते. त्यांना आपल्यामुळे आंनद झाल्याचे पाहून मला बरे वाटायचे. कारण त्यांनी माझ्यासाठी बरेच कष्ट घेतलेले आणि त्यामुळेच ते माझ्यासाठी खूप काही होते.